# विवेक विचार मंच

**भारतीय संविधानाला अपेक्षित सामाजिक न्याय,**
**समताधिष्ठित, बंधुभावपूर्ण समाज निर्मितीसाठी...**



## राजर्षी शाहू महाराज
## सामाजिक न्याय पुरस्कार २०२४

**देव देश वैद्यकीय शैक्षणिक सामाजिक प्रतिष्ठान,** घाटकोपर, मुंबई

# मानपत्र

आपल्या महाराष्ट्राला समतेचा संदेश देणाऱ्या संतांची आणि समाजसुधारकांची मोठी परंपरा लाभलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र हे देशातील एक आधुनिक व सुधारणावादी राज्य म्हणून ओळखले जाते. ज्याप्रमाणे मध्ययुगीन काळात संत ज्ञानेश्वरांनी भक्ती मार्गाने समतेच्या चळवळीचा पाया रचला आणि संत तुकारामांनी त्यावर कळस चढवला, त्याचप्रमाणे आधुनिक कालखंडात महात्मा फुलेंनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा पाया घातला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावर संविधानरुपी कळस चढवला, या चळवळीमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे मोलाचे योगदान असून ते उपेक्षित घटकांसाठी आरक्षणाच्या धोरणाचे जनक आहेत.

या सर्व संतांच्या व समाजसुधारकांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये रुजावीत यासाठी अखंडपणे कार्यरत आहात. सामाजिक न्यायाच्या वृद्धीसाठी आपले मोलाचे योगदान देत आहात. आपण केलेल्या कार्यामुळे समाजातील विषमता व भेदभाव कमी होऊन भारतीय समाज एकसंघ, समतायुक्त व शोषणमुक्त होण्यास निश्चितपणे हातभार लागेल, असा आम्हाला विश्वास आहे. आपण करीत आलेल्या कार्याबद्दल आम्हाला सार्थ अभिमान आहे.

आपल्या सामाजिक कार्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत, दिनांक २३ जून २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री मा.श्री.एकनाथजी शिंदे आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, भारत सरकार चे अध्यक्ष मा.श्री. किशोरजी मकवाना यांच्या शुभहस्ते आपणास ''छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२४'' व मानपत्र सन्मानपूर्वक बहाल करीत आहोत.

**मा.श्री. प्रदीप रावत**
(अध्यक्ष-विवेक विचार मंच, अध्यक्ष-भारत इतिहास संशोधक मंडळ, माजी खासदार, पुणे)

Scanned with Cam